नि. १४९
अर्ज प्रतिवादी क्र. २६(१), २६(२) व २६(३) यांचेतर्फे एकतर्फी आदेश रद्द करणेबाबतचा.
दा.दि. २८/०८/२०२२

रे. दि. मु. नंबर २०/२०१४

**कणकवली येथील मे. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) साहेब यांचे कोर्टात**

**श्री. सुरेंद्र शंकर रावराणे, ----- वादी**

**विरुध्द**


**श्रीमती सुनंदा शंकर रावराणे, वगैरे ३१ ----- प्रतिवादी**

O
Plaintiff to say.
[signature]
२८/८/२२

**प्रतिवादी नंबर २६(१), २६(२) व २६(३) यांचे तर्फे विनंती अर्ज असा की,**

१) प्रतिवादी नंबर २६(१), २६(२) व २६(३) यांना खालील नमूद कारणांमुळे सदर कामी वेळीच कैफियत दाखल करता आलेली नाही. परिणामतः प्रतिवादी नंबर २६(१), २६(२) व २६(३) यांचे विरुद्ध दिनांक २८/०७/२०२२ रोजी "Ex-party" (एकतर्फा काम चालविण्याचा) आदेश झालेला आहे. सदर आदेश रद्द करून प्रतिवादी नंबर २६(१), २६(२) व २६(३) यांना कैफियत देण्यास परवानगी मिळण्यासाठी हा अर्ज आहे.

२) सदरहू कामी प्रतिवादी नंबर २६(१), २६(२), व २६(३) यांना ९० दिवसांच्या मुदतीत आवश्यक त्या कागदपत्रांची उपलब्धता करून आपल्या वकिलांना माहिती देता न आल्याने सदरहू कामी मुदतीत कैफियत देता आलेली नाही व त्यांचे विरुद्ध कैफियत नसल्याचा आदेश झालेला आहे. प्रतिवादी नंबर २६(१), २६(२) व २६(३) यांना सदर कामी आपली कैफियत सादर करण्याची इच्छा होती व आहे. परंतु केवळ वर नमूद कारणांमुळेच मुदतीत कैफियत देणे शक्य झाले नाही.




Received on 13/9/2022
[signature]

O
Perused application and say thereon. Heard the learned counsel for pltf. In my opinion, it will be just and proper to grant an opportunity to deft. nos. 26(1) to 26(3). Hence application allowed in the interest of justice.
[signature]
14/9/2022